2 4 NOV 2025 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातर्फे आतापर्यंत १४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर–नोव्हेंबर हिवाळी सत्रातील परीक्षांचे शुक्रवारअखेर सुमारे १४ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले आहे. विद्यापीठ संलग्न महाविद्यालयात सध्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. दि. २१ रोजी विविध ७४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे पार पडल्या. शुक्रवारी बी.व्होक, बी.लिब. आदी अभ्यासक्रमांच्या विविध सहा सत्रांचे निकाल निकाल जाहीर करण्यात आले आहेत. परीक्षेत भरारी पथकाकडून कोल्हापूर १० व सांगली २ अशा एकूण १२ गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत करण्यात आली आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

24 NOV 2025

पुढारी

# बॉक्सिंग स्पर्धेत श्रीवर्धन पाटीलला सुवर्ण



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर अंतर्गत घेण्यात आलेल्या आंतर विभागीय बॉक्सिंग स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालयाचा खेळाडू श्रीवर्धन सुरेश पाटील (बोंद्रे) बी.ए.भाग २ याने ८० ते ८५ किलो वजनी गटात शिवराज कॉलेज गडहिंग्लजच्या खेळाडूवर मात करून सुवर्णपदक मिळवले. त्याची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बॉक्सिग स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या संघात निवड झाली आहे. त्याला स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात, समन्वयक डॉ. श्रुती जोशी, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले आदींचे मार्गदर्शन लाभले.

24 NOV 2025
पुढारी

# प्रभावी शिक्षणासाठी 'एआय' तंत्रज्ञानाचा योग्य वापर आवश्यक : डॉ. सचिन पाटील

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार प्रभावी शैक्षणिक सुविधांची आवश्यकता आहे. त्याकरिता कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा प्रभावी शिक्षणासाठी वापर होणे आवश्यक आहे. काळानुरूप शिक्षक व विद्यार्थी यांनी बदलत्या शिक्षणपद्धतीमध्ये एआय तंत्रज्ञान आत्मसात करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन डॉ. सचिन पाटील यांनी केले.

विवेकानंद महाविद्यालयाच्या संगणक शास्त्र विभागातर्फे आयोजित अग्रणी महाविद्यालय योजनेअंतर्गत आयोजित कार्यशाळेत प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. एस. पी. थोरात होते. कार्यशाळा समन्वयक प्रा. डॉ. इरफान मुजावर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. विशाल वाघमारे यांनी आभार मानले.

2 4 NOV 2025

पुढारी

# आंतरविभागीय बास्केटबॉल स्पर्धेचा आज अंतिम सामना

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ क्रीडा विभागामार्फत पुरुषांच्या आंतरविभागीय बास्केटबॉल स्पर्धेचा रविवारी अंतिम सामना होणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन कौन्सिल ऑफ एज्युकेशनचे सचिव विश्वनाथ मगदूम यांच्या हस्ते झाले. प्राचार्या डॉ. वर्षा मैदर्गी, प्राचार्य डॉ. प्रवीण पाटील, डॉ. नंदकुमार पाटील, डॉ. शरद बनसोडे, डॉ. समीर पवार, स्पर्धा निरीक्षक डॉ. सुरेश फराकटे, डॉ. संजय पाटील आदी उपस्थित होते.

2 4 NOV 2025

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आयोजित आंतरविभागीय बास्केट बॉल स्पर्धेचे अजिंक्यपद पटकाविणारा न्यू कॉलेजचा संघ. सोबत मान्यवर, प्रशिक्षक-मार्गदर्शक.

# न्यू कॉलेज संघाला अजिंक्यपद

## नाईट कॉलेज उपविजेता; आंतरविभागीय बास्केट बॉल स्पर्धा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ आयोजित इंटर झोनल बास्केट बॉल स्पर्धेत न्यू कॉलेज कोल्हापूर संघाने अजिंक्यपद पटकाविले. अटीतटीच्या अखेरच्या सामन्यात उत्कृष्ट खेळ करत न्यू कॉलेजने नाईट कॉलेजवर ६६-६४ असा विजय मिळविला.

अंतिम ७ सेकंदात बजर बिटर शॉर्टमध्ये कुणाल पाटील याने शेवटच्या क्षणी ३ पॉईंट घेतले. श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, पेठ वडगाव संघाने तिसरा क्रमांक मिळविला. बक्षीस वितरण शिवाजी विद्यापीठ क्रीडा संचालक प्रा. डॉ. शरद बनसोडे, प्रा. किरण पाटील, प्रा. रोहन आडनाईक, प्रा. दिगंबर फराकटे यांच्या हस्ते झाले.